I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S. (पोलीस ठाणे):** सदर बाज़ार **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0858 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/10/2025 03:02 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्हयाची घटना):**

1 **Day (दिवस):** गुरूवार **Date from (दिनांक पासून):** 30/10/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 30/10/2025

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 17:30 तास **Time To (वेळेपर्यंत):** 17:49 तास

2 **Day (दिवस):** गुरूवार **Date from (दिनांक पासून):** 30/10/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 30/10/2025

**Time Period (कालावधी):** प्रहर ७ **Time From (वेळेपासून):** 18:23 तास **Time To (वेळेपर्यंत):** 18:34 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 31/10/2025 **Time (वेळ):** 02:45 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 009 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 31/10/2025 03:02 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 02 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पंचायत समिती दक्षिण , सोलापूर,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

2. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** उत्तर, 02 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** जिल्हा परिषद सोलापूर चे समोर, सोलापूर ,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शैलेश चंद्रकांत पवार

(b) **Father's Name (चे नाव ):** चंद्रकांत पवार

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1984 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):**भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नेम लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर, सदर बाज़ार, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |

| | | |
|---|---|---|
| 2 | स्थायी पता | नेम लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर, सदर बाज़ार, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9657917317

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | संदिप खरबस | | | 1. नेम विस्तार अधिकारी,पंचायत समिती,Town/Village (शहर / गाव): दक्षिण सोलापूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): सदर बाज़ार,District (जिल्हा): सोलापुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनाच्या विविध नोटा | 2,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 2,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद तारीख 31/10/2025

मी. श्री. शैलेश चंद्रकांत पवार, वय - 41 वर्षे व्यवसाय नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 9657917317.

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे सन जून / 2025 पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 30/10/2025 रोजी 16:00 वा. आम्ही व श्री. प्रशांत चौगुले पोलीस उपअधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर असे कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री. दयानंद महादेव पाटील मुळ रा. कोरवली, ता. मोहोळ हल्ली रा. 152 अवंती नगर, जुना पुना नाका सोलापूर हे अँन्टी करप्शन सोलापूर कार्यालयात हजर झाले. त्यांनी त्याची लाच मागणीसंदर्भात तक्रार असल्याचे सांगितले. त्यावरून पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत चौगुले यांनी सदर तक्रारदार पाटील यांचे तक्रारीवरून कारवाई करणेस आम्हास सांगितलेने लागलीच आम्ही आमचेकडील अंमलदार यांचे मार्फत दोन शासकिय पंच उपलब्ध करून देणेबाबत मा. सहाय्यक अभियंता, क उप विभाग, महा. राज्य विदयुत वितरण कंपनी, शाखा कार्यालय, जिल्हा न्यायालय सोलापूर यांना पत्र दिले.

त्यानंतर दि.30/10/2025 रोजी 16/30 वा. चे सुमारास पंच (1) श्री. सदानंद गोपाळ हक्के वय 40 वर्षे, पद वरीष्ठ तंत्रज्ञ नेम. क उप विभाग महाराष्टय् राज्य विदयुत वितरण कंपनी, सोलापूर रा. 175 भवानी पेठ, काका गणपती जवळ, सोलापूर व (2) श्री. अंकुश गुरूनाथ लोहार वय 35 वर्षे, पद वरीष्ठ तंत्रज्ञ नेम. क उप विभाग महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी, सोलापूर, रा. प्लॉट नं. 131 निर्मल सीटी फेज 1 दहिटणे, ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर युनिट येथील कार्यालयातील आमचे दालनात आमचे समक्ष उपस्थित झाले.

त्यावेळी मी दोघा पंचांना माझी ओळख शैलेश पवार, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर अशी सांगुन त्यानंतर आमचे दालनात उपस्थित असलेले तक्रारदार श्री. दयानंद महादेव पाटील व वर नमुद दोन्ही पंच यांची आपसात ओळख करून दिली. त्यानंतर वर नमूद पंच साक्षीदार यांना आम्ही तक्रारदार श्री. दयानंद महादेव पाटील यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून पुढील कार्यवाही करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र. 1 म्हणून श्री. सदानंद गोपाळ हक्के व पंच क्र. 2 म्हणून श्री. अंकुश गुरूनाथ लोहार असे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व त्यांची तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता त्यांनी त्यांचे नाव श्री. दयानंद महादेव पाटील, वय 49 वर्षे, पद ग्रामपंचायत अधिकारी, येळेगाव, ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर, रा. घर नंबर 152 आर, आवंती नगर सोलापूर जि. सोलापूर असे असल्याचे सांगून, मौजे येळेगाव ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील सी.सी. रोड केलेल्या कामाची मंजूर बीलाची रक्कम ग्रापंचायत बॅक खात्यामूधन काढण्याची परवानगी देणेकरीता श्री. संदिप खरबस, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण

सोलापूर हे बीलाचे 2 टक्के रक्कम लाच स्वरुपात मागणी करीत असलेबाबत थोडक्यात हकीकत सांगितली त्यानंतर त्यांना सदरची तक्रार त्यांचे स्व:हस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितली असता तक्रारदार यांनी त्यांची सविस्तर तक्रार स्व:हस्ताक्षरामध्ये लिहुन दिली ती पुढीलप्रमाणे.

"मी अर्जदार, उपरोक्त विषयास अनुसरुन तक्रारी अर्ज देत आहे की, मी दयानंद महादेव पाटील, ग्रामपंचायत येळेगाव ता. दक्षिण सोलापूर येथे ग्रामपंचायत अधिकारी, म्हणून ऑगस्ट 2023 पासून नेमणूकीस आहे.

मौजे येळेगाव, ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथे शासनाचे 15 वा वित्त आयोग अबंधित अंतर्गत श्री. विलास डोलारे याचे घर ते श्री. अंकुश डावरे यांचे घर या दरम्यान सिमेंट कॉक्रीटरोड या कामास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडील प्रशासकीय मान्यता क्र. जिपसो/साप्रवि-2/ग्रापं/मुलकी-3/1-1377083/13/25, दि. 19/08/2025 अन्वये मान्यता दिली होती.

वरील प्राप्त मान्यतेच्या अनुषंगाने ग्रामपंचायत येळेगाव येथील श्री. विलास डोलारे याचे घर ते श्री. अंकुश डावरे यांचे घर या दरम्यान सिमेंट कॉक्रीटरोडचे काम श्री. संजय हनुमंत लोनारी, विद्यमान संरपंच मौजे येळेगाव ग्रामपंचायत ता. दक्षिण सोलापूर यांनी सदर रोडचे काम पुर्ण करुन शाखा अभियंता, श्री. कोंडगुळे व उप अभियंता, श्रीमती बीडला मॅडम, पंचायत समिती दक्षिण सोलापूर यांचेकडून काम पुर्ण झाले बाबतचे 1,00,000/- रुपयेचे मुल्यांकन प्रमाणपत्र ग्रामपंचायत येळेगाव येथे सादर केले होते.

श्री. कोंडगुळे, शाखा अभियंता, व श्रीमती बीडला मॅडम, उप अभियंता, पंचायत समिती दक्षिण सोलापूर यांचेकडून काम पुर्ण झाले बाबतचे 1,00,000/- रुपयेचे मुल्यांकन प्रमाणपत्राचे अनुषंगाने मी पुढील केले कामाचे बील मंजुरी करीता दि. 17/10/2025 रोजी मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर यांचे नावे रिपोर्ट करुन, आज दि. 30/10/2025 रोजी मी माझे मोबाईल नंबर 9284448088 या वरुन श्री. संदिप खरबस, पद विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर यांचे मोबाईल नंबर 8181882005 वर फोन करुन सदर प्रकरणाचे अनुषंगाने चर्चा केली. त्यावेळी श्री. संदिप खरबस यांनी मला सदर प्रकरण आज दि. 30/10/2025 रोजी घेवून या, सदर कामाचे मंजुर बीलाची रक्कम ग्रामपंचायत बँक खात्यामधून काढण्याची परवानगी देतो तसेच येताना बीलाचे रक्कमेच्या 2 टक्के रक्कम द्यावी लागेल असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना ठिक आहे असे म्हणून फोन कट केला.

त्यानंतर मी श्री. संदिप खरबस, पद विस्तार अधिकारी, हे मला मागणी करत असलेल्या लाच रक्कमे बाबत मी खात्री केली असता ती कोणतीही शासकीय फि नसून ती लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली. मला श्री. संदिप खरबस, पद विस्तार अधिकारी, यांना सदर कामातील बीलाचे 2 टक्के प्रमाणे 2000/- रुपये लाच रक्कम देण्याची इच्छा नाही. त्यामुळे त्यांचेवर आपले विभागाकडुन योग्य ती कारवाई करावी ही विनंती.

माझ्या तक्रारी अर्जासोबत मी ग्रामपंचायत येळे गाव येथील श्री. विलास डोलारे याचे घर ते श्री. अंकुश डावरे यांचे घर या दरम्यान सिमेंट कॉक्रीट रोडचे केलेल्या कामांचे कागदपत्रांची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

माझेत व श्री. संदिप खरबस, पद विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर यांचेत कोणताही अर्थिक व्यवहार नाही. तथा आमचेमध्ये सदर कामाचे व्यतीरिक्त कोणताही आर्थिक

व्यवहार झालेला नाही. माझी वरील लाच मागणीची तक्रार माझे स्व:हस्ताक्षरात लिहून दिली. तरी श्री. संदिप खरबस, पद विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर यांचेवर योग्य कारवाई करावी ही विनंती." वगैरे मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिली. नंतर सदरची तक्रार आम्ही व वर नमुद पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

लोकसेवक खरबस यांनी तक्रारदार श्री. पाटील यांना दि. 30/10/2025 रोजी पंचायत समिती दक्षिण सोलापूर येथे बोलविले असल्याने तक्रारदार श्री. पाटील यांचे तक्रारीनुसार लोकसेवक खरबस यांचेवर लाच मागणीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई करण्याकरिता आम्ही तक्रारदार श्री. पाटील व दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील व्हाईस रेकॉर्डर व पॅकिंग मधील 08 जीबी चे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगीतला. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. पाटील यांचेकडे लोकसेवक खरबस हे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. पडताळणीसाठी पंच क्र. 1 म्हणुन श्री. सदानंद गोपाळ हक्के पंच क्र. 2 म्हणून श्री. अंकुश गुरूनाथ लोहार हे काम पाहतील असे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 हक्के पंच क्र. 02 लोहार यांचे निवेदन घेण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये ईव्हिएम कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड त्यांचे पाकिटातून बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली.

त्यानंतर तक्रारदार श्री. पाटील व त्यानंतर पंच क्र. 1 श्री. हक्के पंच क्र. 02 श्री. लोहार यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 17.25 वा ची होती. त्यानंतर तक्रारदार श्री. पाटील यांना लोकसेवक खरबस यांचेकडे लाच मागणी पडताळणी कामी पाठवण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार व तक्रारदार यांना पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो तक्रारदार श्री. पाटील यांचे शर्टाच्या आतील बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून व तक्रारदार यांना पंच क्र. 01 श्री. हक्के यांचेसह पडताळणीकामी तक्रारदार यांची पांढरे रंगाचे होंडा कंपनीची ॲक्टीव्हा मोटार सायकल क्र. एम. एच. 13 डी. डब्ल्यु. 0809 वरून सोलापूर शहरातील पंचायत समिती दक्षिण सोलापूर येथे रवाना केले त्यावेळी व्हाईसरेकॉर्डर चालू केला ती वेळ 17.30 वा ची होती.

त्यानंतर आम्ही व पंच क्र. 02 लोहार असे लाचलूचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथे थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 01 असे लाचलूचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथील कार्यालयात परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 17.49 वा. ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले ते आमच्या समक्ष पंच क्र. 2 श्री. लोहार यांना सांगा असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार पाटील असे तक्रारदार यांचे मोटार सायकल वरुन रंगभवन चौक, मार्गे पंचायत समिती दक्षिण सोलापूर येथे गेलो. तेथे मोटारसायकल खाली पार्किंगमध्ये लावून मी व तक्रारदार पाटील असे पहिल्या मजल्यावरील पंचायत समिती दक्षिण सोलापूर कार्यालयात गेलो असता आतमध्ये उजवे बाजूस असलेले हॉलमध्ये गेलो. तेथे तक्रारदार पाटील यांनी जावून लोकसेवक खरबस यांची भेट घेवून त्यांचे मौजे येळेगाव ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील सी.सी. रोड केलेल्या कामाची मंजूर बीलाची रक्कम ग्रामपंचायत बॅक खात्यामूधन काढण्याची परवानगी

देणेकरीताचे कामाचे अनुषंगाने चर्चा केली त्यादरम्यान लोकसेवक खरबस यांनी दया इकड लवकर दोन हजार रुपये तुम्ही दिवाळीत गाठ नाही भेट नाही काम नाही .... आमची तर कुठली झाली ओ आणा पैसे हिकडं.. दोन हजार रुपये चला द्या पटकनं द्या..द्या पटकनं अशिर करु नका संध्याकाळी असे म्हणाले त्यावेळी तक्रारदार यांनी खिशात नाहिती..मग त्यावेळी आलोसे खरबस यांनी लक्ष्मी संध्याकाळी द्यायची असती पटकनं.. असे म्हणून तक्रारदार पाटील यांचेकडे 2000/- रू लाचेची मागणी केली. त्यानंतर आम्ही त्यांना एटीएम मधून जावून पैसे आणतो असे सांगून मी व तक्रारदार पाटील असे त्यांचेकडील मोटार सायकल वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय सोलापूर येथील कार्यालयात परत आलो असे सांगीतले.

त्यानंतर तक्रारदार पाटील यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी पंच क्र. 01 हक्के यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे गळयातून काढून घेतलेला व्हाईस रेकॉर्डर आमचेकडील संगणकाला लावून झालेले संभाषण ऐकले असता सदरचे संभाषण आम्ही दोन्ही पंच व तक्रारदार यांनी ऐकले असता ते पंच क्र. 01 हक्के व तक्रारदार यांनी वर सांगीतले प्रमाणे संभाषण झाल्याचे निष्पन्न झाले.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारी वरून तक्रारदार यांना लोकसेवक खरबस यांचेकडे दि. 30/10/2025 रोजी पडताळणी कामी पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना त्यांच्या मौजे येळेगाव ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील सी.सी. रोड केलेल्या कामाची मंजूर बीलाची रक्कम ग्रापंचायत बॅक खात्यामूधन काढण्याची परवानगी देणेकरीता लोकसेवक खरबस यांनी दोन

हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे व आजच लवकर सदरची लाच रक्कम घेवून पंचायत समिती कार्यालय, दक्षिण सोलापूर येथे बोलावले असलेचे स्पष्ट झाले.

त्यानंतर आम्ही लोकसेवक खरबस यांचेविरूध्द सापळा कारवाई करणेचे अनुषंगाने पोहेकॉ/ 1837 घाडगे, पोहेकॉ/ 571 मुल्ला, पोना/1616 जाधव, पोकॉ/1368 राठोड यांना आमचे दालनात बोलावून त्यांची व तक्रारदार पाटील व दोन्ही शासकीय पंच यांची आपसात ओळख करून दिली. व तक्रारदार पाटील यांनी दिलेले तक्रारीवरून लोकसेवक खरबस विस्तार अधिकारी पंचायत समिती दक्षिण सोलापूर यांची पडताळणी केली असता त्यांनी 2000/- रू लाचेची मागणी केलेचे व सदरची रक्कम पंचायत समिती दक्षिण सोलापूर येथे घेवून येणेस सांगितले असलेचे निष्पन्न झाल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार पाटील तसेच सापळा पथकास सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार पाटील यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लोकसेवक खरबस यांना देणेसाठी म्हणून 500/- रू दराच्या 4 चलनी नोटा एकूण रक्कम 2,000/- रुपये हजर केले. त्यानंतर पोना/जाधव यांनी नमुद नोटांचे नंबर कार्यालयातील संगणकावर टाईप करून घेवून त्याची प्रिन्ट काढली व त्यावर आम्ही पंचांनी सहया करून तो कागद आमचेकडेच सुरक्षित ठेवला. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समाजावून सांगून त्याबाबतचे प्रात्यक्षिक कार्यालयात कृत्रीम अंधार करुन दाखिवले. त्यानंतर सदरच्या चलनी नोटा पोकॉ/1368 राठोड यांना अँन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता, पोकॉ/ राठोड यांनी कापसाच्या बोळयाने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस अँन्थ्रासीन पावडर लावली व त्यानंतर त्यांनी सदर लाचेची

रक्कम तक्रारदार पाटील यांच्या नेसणीस असलेल्या शर्टाच्या वरील डाव्याबाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही पंचांना तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या.

त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची "अंगझडती व लाचेची रक्कम"जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण पोहेकॉ/ 571 मुल्ला हे त्यांचेकडील मोबाईलमध्ये करणार असल्याचे सांगितले. तसेच सदर पडताळणी कारवाई मध्ये वापरलेले मेमरी कार्ड पुढील सापळा कारवाईसाठी वापरण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये यापूर्वी पडताळणी कारवाईतील संभाषण ध्वनिमुद्रीत झाले असलेची खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार पाटील व दोन्ही पंचाचे निवेदने सदरचे व्हाईस रेकॉर्डरव्दारे ध्वनिमुद्रीत करून घेतले ती वेळ 18.13 वा ची होती.

त्यानंतर लोकसेवक खरबस यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार पाटील यांना व्हॉईस रेकॉर्डर 18.23 वा. चालू करुन त्याचे शर्टाच्या आतील बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून शासकिय पंच क्र.1 श्री. हक्के यांचेसह तक्रारदार यांचेकडील पांढरे रंगाचे होंडा कंपनीचे अॅक्टीव्हा मोटार सायकल क्र. एम एच 13. डी. डब्ल्यू. 0809 या वरुन पंचायत समिती कार्यालय दक्षिण सोलापूर येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक शासकिय वाहन क्र. एम.एच. 12 यु.सी. 4098 या मधून रवाना झालो. पंचायत समिती दक्षिण सोलापूर कार्यालयाच्या काही अंतरावर शासकिय वाहन कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबवले व पंच क्र. 02 तसेच सापळा पथक वाहनातून उतरून कार्यालयाच्या जवळ कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून होतो. तक्रारदार व पंच क्र. 01 हे पंचायत समिती दक्षिण सोलापूर येथील पहिल्या मजल्यावरील कार्यालयात गेले व लगेच काही वेळात खाली परत आले. त्यावेळी तक्रारदार पाटील यांनी पंच व सापळा पथकास उद्देशून जिल्हा परिषद मध्ये या म्हण.. जिल्हा परषिद ग्रामपंचायत विभाग मध्ये हायत म्हण... असे सांगून ते व पंच 1 असे पायी चालत जवळच असलेल्या जिल्हा परिषदकडे निघालेने लागलीच आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पथक असे त्यांचे पाठीमागे जिल्हा परिषदेचे पश्चिम बाजूचे लोखंडी गेट मधून चालत आत ग्रामपंचायत विभाग जवळ जावून कोणसही संशय येणार नाही अशा प्रकारे सापळा लावून थांबलो. तेव्हा तेथे एक इसम तक्रारदार पाटील यांचे सोबत बोलत जिल्हा परिषदेमधून बाहेर गेले. त्यावेळी सदर व्यक्तीने हाताने इशारा करून काय असे म्हणून लाच रक्कमेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार यांनी हा म्हणून त्यांचे शर्टाचे डावेबाजूकडील खिशातून लाचेची रक्कम उजव्या हाताने काढून त्या इसमासमोर धरले असता ते त्यांनी उजव्या हाताने स्विकारून त्याचे पॅन्टचे उजवे खिशात ठेवले त्यावेळी आलोसे यांनी किती हायत.. असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी दोन असे म्हणले त्यानंतर आलोसे यांनी हो असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी रक्कमेची खात्री करण्याचे उद्देशाने दोन हजार हायत ना? असे विचारले असता आलोसे यांनी हो असे म्हणाले. दरम्यानच्या कालावधीत पंच नं. 1 हक्के यांनी त्यांचे डोक्यावरून डावा हात फिरवून लाच रक्कम स्विकालेचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी आम्ही व सापळा पथक तक्रारदार यांचे जवळ जावून आम्ही लोकसेवक खरबस यांचा उजवा हात व पोहेकॉ/ घाडगे यांनी लोकसेवक खरबस यांचा डावा हात पकडला. त्यानंतर आम्ही लोकसेवक खरबस

यांना लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे अधिकारी असल्याचे सांगून त्यांना हालचाल करण्यास मनाई केली. त्याचवेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईसरेकॉर्डर काढून बंद केला ती वेळी 18/34 वा. ची होती.

त्यानंतर पोह/मुल्ला यांनी त्यांचे मोबाईलवरून सदर घटनेचे व्हिडीओ रेकॉर्डींग सुरू केले. त्यानंतर आम्ही लोकसेवक खरबस यांना त्यांचे नाव विचारता त्यांनी त्यांचे नाव संदीप सुधाकर खरबस वय-52 वर्षे रा. प्लॉट नं. 15 सिध्दाराम नगरी, व्टींकल इंग्लिश मेडियम स्कूल जवळ, जुळे सोलापूर असे असल्याचे सांगून ते पंचायत समिती दक्षिण सोलापूर येथे विस्तार अधिकारी या पदावर कर्तव्यास असल्याचे सांगीतले.

त्यानंतर आम्ही आरोपी लोकसवेक खरबस यांना लाच रक्कम कुठे ठेवली आहे याबाबत विचारले असता त्यांनी पँटच्या उजव्या बाजूच्या खिशातून लाचेची रक्कम काढून आमचेकडे दिली ती लाच रक्कम पंच क्र. 2 श्री. लोहार यांचेकडे दिल्या त्यानंतर सदर ठिकाणीच आम्ही तसेच बाजूस सापळा पथकातील पंच व अमंलदार असे सर्वजण एकत्र गोल करुन त्या अंधारात आलोसे खरबस यांनी स्विकार केलेली लाच रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर फिक्कट हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर आलोसे यांची तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताला तसेच लोकसेवक खरबस यांचे नेसते पॅन्टचे उजवे खिशाचे आतील बाजूस अँन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट हिरवट रंगांची चकाकी दिसून आली. त्यानंतर लोकसेवकाकडील मिळून आलेल्या नोटांचे क्रमांकाची पंच नं. 2 यांचे करवी तपासणी केली असता त्या तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाशी तंतोतंत जुळून आल्या. त्यानंतर आरोपी लोकसेवक खरबस यांना शासकिय वाहनातून लाप्रवि कार्यालय सोलापूर येथे आणण्यात आले.

त्यानंतर पंच क्र. 01 श्री. हक्के यांना सापळा कारवाईदरम्यान लाचेची रक्कम आलोसे खरबस यांना देण्यासाठी गेल्यानंतर काय घडले हे आमच्या समक्ष पंच क्र. 02 यांना सांगा असे म्हणालो असता पंच क्र. 1. श्री. हक्के यांनी सांगीतले की,

"मी व तक्रारदार श्री. पाटील असे त्यांचे दुचाकी वरून लाचलूचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातून निघून रंगभवन मार्गे पंचायत समिती कार्यालय दक्षिण सोलापूर येथे लोकसेवक खरबस बसतात त्या हॉलमध्ये गेलो असता तेथे लोकसेवक खरबस हे नसलेने तक्रारदार पाटील यांनी तेथील एका इसमास खरबस साहेब गेले का असे विचारले असता त्यांनी नाही साहेब मी आत्ताच आलो .. नव्हते साहेब असे सांगितलेने तक्रारदार पाटील यांनी त्यांचा मोबाईन नं. 9284448088 यावरून लोकसेवक खरबस यांचे मोबाईल नं. 8181882005 यावर फोन केला असता तो बंद लागलेने त्यांचा दुसरा नंबर 8983726805 वर फोन लावला व स्पिकर ऑन करून बोलने केले त्यावेळी लोकसेवक खरबस यांनी झेड. पी. त हाय ग्रामपंचायत विभाग. असे म्हणाले असता तक्रारदार पाटील यांनी इकड येणार हाय का तिकड येऊ दे.. तिकडे येवू हा मग असे विचारले असता लोकसेवक खरबस यांनी हा... असे म्हणून तक्रारदार यांना जिल्हा परिषदमध्ये बोलावलेने तक्रारदार व मी असे पंचायत समिती दक्षिण सोलापूर चे कार्यालयातून बाहेर आलो व त्यावेळी तक्रारदार यांनी तुम्हाला, पंच क्र. 2 व व सापळा पथकास उद्देशून जिल्हा परिषद मध्ये या म्हण.. जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभाग मध्ये हायत म्हण.. असे सांगून मी व तक्रारदार असे जवळच असलेले जिल्हा परिषद कडे चालत गेलो. व आमचे मागे आपण, पंच नं. 2 व सापळा पथक असे जिल्हा परिषद सोलापूरचे पश्चिम बाजूचे लोखंडी

गेटमधून चालत ग्रामपंचायत विभागाजवळ येवून सापळा लावून थांबलात. तेथे तक्रारदार यांनी आलोसे खरबस यांचेशी बोलले व चालत जिल्हा परिषदेचे मुख्य दरवाजातून बाहेर चालले त्याचवेळी खरबस यांनी हाताने इशारा करून काय असे म्हणून लाच रक्कमेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार यांनी हा म्हणून त्यांचे शर्टाचे डावेबाजूकडील खिशातून लाचेची रक्कम उजव्या हाताने काढून त्या खरबस यांचेसमोर धरले असता ते त्यांनी उजव्या हाताने स्विकारून त्याचे पॅन्टचे उजवे खिशात ठेवले त्यावेळी खरबस यांनी किती हायत.. असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी दोन असे म्हणले त्यानंतर खरबस यांनी हो असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी रक्कमेची खात्री करण्याचे उद्देशाने दोन हजार हायत ना? असे विचारले असता खरबस यांनी हो असे म्हणाले. त्यावेळी मी माझे डोक्यावरून माझा डावा हात वारंवार फिरवून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी आपण व सापळा पथकाने खरबस यांना पकडले. त्यानंतर तक्रारदार यांना घडलेल्या घटनेबाबत विचारले असता त्यांनी सुध्दा वरील प्रमाणे हकिकत सांगीतले सदर बाबत सविस्तर पंचनामा अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सोलापूर येथे करण्यात आला.

तरी दि. 30.10.2025 रोजी तक्रारदार श्री. दयानंद महादेव पाटील यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. 30.10.2025 रोजी 17/30 वा. पासून 17/49 वा. चे दरम्यान पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांचे मौजे येळेगाव ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील शासनाचे 15 वा वित्त आयोग अंतर्गत सिमेंट कॉक्रेट रोडचे काम ग्रामपंचायतीचे मार्फतीने केलेले होते. सदरचे कामाची मंजूर बीलाची रक्कम ग्रामपंचायत बॅक खात्यामूधन काढण्याची परवानगी देणेकरीता आरोपी लोकसेवक श्री. संदिप खरबस, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर यांनी पंचायत समिती दक्षिण सोलापूर येथील त्यांचे कार्यालयात बीलाचे 2 टक्के रक्कम 2000/- रू ची लाचेची मागणी करून ती रक्कम पंच साक्षीदार यांचे समक्ष दिनांक 30.10.2025 रोजी 18/23 वा ते 18/34 वा. चे दरम्यान जिल्हा परिषद सोलापूर चे समोर स्वत: स्विकारून स्वत:चा आर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केला आहे म्हणून माझी आरोपी लोकसेवक संदीप सुधाकर खरबस पद विस्तार अधिकारी, पंचायत समिती दक्षिण सोलापूर रा. प्लॉट नं. 15 सिध्दाराम नगरी, व्टींकल इंग्लिश मेडियम स्कूल जवळ, जुळे सोलापूर यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला.

समक्ष

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** namdev vitthal bandgar (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** namdev vitthal bandgar

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** pi

**14.** **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**